Trust Reg. No. MH/551/01/A.nagar || सहवीर्यं करवावहै || BPT Act Reg.No. F-6426/01/A'nagar

# SANKALPA PRATISHTHAN

*"Savalee" Working for unprivileged Children*

President : Nitesh Bansode (Estd. 2001)

S. No. 52/1, Plot No.3, Link Road, Bhushannagar, Kedgaon, Ahmednagar 414 005 (M.S.). Tel.: (0241) 2953355, Mo. 9890969315, E-mail : info.savalee@gmail.com, savalee2008@gmail.com website : www.savalee.org

Ref. No. संकल्प / २२६ / २०२३ -२४ Date : १२ / मार्च /202 ४

प्रती,

.........................................

.........................................

विषय :- संकल्प प्रतिष्ठान अंतर्गत सावली पुनर्वसन प्रकल्पाच्या बांधकाम कामासाठी सहयोग मिळणे बाबत ....

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये सविनय सादर करण्यात येते कि, केडगाव येथील संकल्प प्रतिष्ठान सावली या स्वयंसेवी संस्थेने पुनर्वसन प्रकल्प उभारणीच्या मदतीसाठी प्रकल्प प्रस्ताव सादर केला आहे. तुमच्या पाठिंब्याने आणि सावलीच्या दोन दशकातील सामाजिक कामाच्या अनुभवाने समाजातील वंचित आणि आणि दुर्बल घटकांतील बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणे सोपे होईल.

आम्ही आपणास विनंती करतो की कृपया आपण या कार्यासाठी मदत करावी.

आवश्यक असलेल्या कोणत्याही अधिक माहितीसाठी आम्हाला संपर्क करा.

आपला विश्वासू

सोबत ..

- प्रकल्प प्रस्ताव
- संस्था रजी प्रमाणपत्र
- ८० ग
- १२ अ
- एफ.सी.आर.ए पप्रमाणपत्र
- घटना
- पन कार्ड



CamScanner

# प्रकल्प प्रस्ताव

## संकल्प प्रतिष्ठान संचलित सावली पुनर्वसन प्रकल्प

## वांजोळी, (पांढरीपूल जवळ), ता- नेवासा

## जिल्हा - अहमदनर

**सादर कर्ते -**

संकल्प प्रतिष्ठान

केडगाव, अहमदनगर

CamScanner

**प्रस्तावना :-**

'संकल्प प्रतिष्ठान' ची स्थापना निराधार, वंचित, उपेवित आई वडील नसलेल्या, उस तोड कामगारांच्या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अहमदनगर शहरात सन २००१ साली करण्यात आली. एकाकी, मानसिक दडपण असलेली, आत्मविश्वास गमवलेली, परस्थिती मुळे शिक्षणाची आवड संपलेली संपलेली आणि त्यामुळे मानसिक अस्वस्थता आलेली मुले सावलीत येत गेली. या दोन दशकात सामाजिक कृतज्ञता असणाऱ्या अनेक व्यक्तींच्या सहयोगाने सावलीच्या कामावर विश्वास ठेवल्याने मुलांना कौटुंबिक वातावरण, चांगले शिक्षण, पोषक आहार, आरोग्याच्या सुविधा, शुद्ध पाणी व राहण्याची जागा उपलब्ध करून देता आली.

**मिशन**: उपेक्षित, विशेषतः आई वडील नसलेले, एकल पालक मुले, जोखीम असलेल्या तरुण आदिवासींच्या सक्षमीकरणासाठी कार्य करणे, गमावलेला सन्मान पुनर्संचयित करण्यासाठी योग्य दृष्टीकोनातून.

**उद्दिष्टे**: आई वडील नसलेले, एकल पालक आणि गरीब मुलांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, प्रशिक्षण आणि संरक्षण प्रदान करणे आणि काही स्वयंपूर्ण व्यावसायिक क्रियाकलापांसह त्यांचे पुनर्वसन करणे. या मुलांना त्यांचे नैसर्गिक आणि योग्य बालपण देण्याच्या दिशेने प्रयत्न केले जातात.

**संकल्प प्रतिष्ठान** :-

महाराष्ट्रातील गरीब आणि वंचित लोक अनेक सामाजिक आणि आर्थिक समस्यांमध्ये अडकले आहेत. गरिबी आणि योग्य शिक्षणाच्या अभावामुळे, झोपडपट्ट्या आणि गावे बालकामगार, देहव्यापारात अल्पवयीन मुले, अंमली पदार्थांची तस्करी आणि इतर गंभीर प्रकारच्या गुन्ह्यांसाठी मुले देतात. एचआयव्ही/एड्सचा प्रसार, लैंगिक संक्रमित रोग, सर्व प्रकारची व्यसने, बालविवाह हे महाराष्ट्रातील दुष्काळी जिल्ह्यातील बहुतांश झोपडपट्ट्या आणि वाड्यांचे वास्तव आहे. या भीषण परिस्थितीमुळे संकल्प प्रतिष्ठानने अहमदनगरच्या सावली प्रकल्पाच्या माध्यमातून गरीब व अनाथ मुलांच्या शिक्षणाचे मूलभूत प्रश्न सोडविण्याचा निर्णय घेतला आहे. शिक्षण हे उत्प्रेरक आहे आणि ते गरीब कुटुंबातील कोणत्याही मुलाचे नशीब बदलू शकते.

केडगाव अ.नगर येथील सावली प्रकल्पात ५० विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि पोषणविषयक समस्यांना आधार देणारा संकल्प प्रतिष्ठान तर्फे आज शैक्षणिक विकास उपक्रम राबविला जातो. या वसतिगृहातील सर्व मुले अत्यंत गरीब, एकल पालक, अनाथ आणि निम्न सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीतील आहेत. त्यांची कुटुंबे अशिक्षित होती आणि त्यांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे महत्त्व माहीत नाही.

अन्न आणि शिक्षणाचा हा महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेऊन संकल्प प्रतिष्ठानने ग्रामीण भागात व्यवसाय प्रशिक्षण, संगणक प्रशिक्षण, महिला सक्षमीकरण, अप्रगत व शाळाबाह्य मुलांसाठी शालेय वर्ग इत्यादी उपक्रमांसह शिक्षण आणि निवारा देण्यासाठी आपले उपक्रम सुरू केले आहेत. आता आम्हाला वसतिगृहाचा आदर्श निर्माण करायचा आहे. स्थलांतरासाठी सुप्रसिद्ध असलेल्या भागातून विद्यार्थी येत असल्यामुळे दरवर्षी सुमारे १३.९५% मजूर उपजीविकेच्या शोधात मुंबई, लातूर, उस्मानाबाद आणि इतर जिल्ह्यात उसाच्या शेतात व कारखान्यांच्या शोधात स्थलांतर करतात.

गेल्या दोन दशकाच्या अनुभवातून शिकून आणि मुलांची आणि त्यांच्या पालकांची मानसिकता लक्षात घेऊन, त्यांच्या क्षमता, गरजा आणि अपेक्षा जाणून घेऊन, चालू वर्षासाठी आम्ही आमच्या कार्यक्रमात बरीच सुधारणा केली आहे, यामुळे गळती थांबेल. शिक्षणाच्या प्रवाहातील विद्यार्थ्यांपैकी. सध्या बालगृहात

CS CamScanner

30 विद्यार्थी आहेत. याच अनुभावाच्या बळावर "मुलांच्या समृद्ध विकासाच्या स्वप्नांसाठी पुढील निवासी प्रकल्पाची उभारणी तीन एकर जागेत कराण्याची सुरुवात करत आहोत".

**तर्क : –**

संस्थेच्या विकास काळात संस्थेचे संस्थापक श्री. नितीश बनसोडे हे सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी झाले होते, संस्थापकांचा सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग पूर्णपणे ऐच्छिक होता जो ज्ञानाचे हस्तांतरण आणि वास्तवात बदल करण्यासाठी उल्लेखनीय राहिला. शोषण, अत्याचार, अस्पृश्यता, निरक्षरता, भ्रष्टाचार, अत्याचार आणि उदरनिर्वाहासाठी जमीन इत्यादी प्रचलित मुद्द्यांवर हातभार लावणे ही त्यांच्यासाठी उत्साहाची आणि सामाजिक जबाबदारी होती. गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना आधार देण्यासाठी निवारा.

सामाजिक कार्यात कार्यकर्ता म्हणून सहभाग घेतल्याने संस्थापकांना सर्वसमावेशक ज्ञान आणि गरीब समाजातील विद्यार्थी, त्यांची मूल्ये, नियम, परंपरा आणि विविध स्तरांवरील भेदभावाचे प्रकार तसेच गरीबांना दिल्या जाणाऱ्या निकृष्ट उपचारांबद्दल आत्मसंवेदना वाढवण्यास मदत झाली. आणि वंचित. दैनंदिन जीवनात विशेषत: अनाथ, भटक्या विमुक्त जमाती तसेच समाजातील उपेक्षित समाजातील लोकांचा अनुभव घेत अत्यंत क्लेशकारक जगणे संस्थापकांना अनुभवता आले. या कालावधीत गरीब आणि अदृश्य लोकांना मदत करण्यासाठी विधायक हस्तक्षेपाने त्यांच्यामध्ये सर्वात उपेक्षित, वंचित गरीब आणि अनाथ यांच्या सक्षमीकरण आणि विकासासाठी वचनबद्ध राहण्याची प्रेरणा एकत्रित केली आणि वर्धित केली. त्याच वेळी त्यांच्या लक्षात आले की परिस्थिती आणि वास्तविकता मजबूत आहेत आणि निर्धारित कालावधीत ते काढणे पूर्णपणे कठीण आहे. हे व्यवस्थापित करणे कठीण असल्याने आर्थिक सहाय्यासह ज्ञान आणि कौशल्यांसह दीर्घकालीन संघटित हस्तक्षेप आवश्यक होता.

**संकल्प प्रतिष्ठान अंतर्गत सद्यस्थितीला चालू प्रकल्प :-**

**१) सावली :-**

आपल्या परिसरातील निराधार वंचित मुल व महिला ह्यांच्या समृद्ध आत्मिक विकासासाठी त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग सुखकर करणे व या माध्यमातून शांतीप्रिय विकसित व समृद्ध समाज घडविणे या उद्देशाने सन २००१ साली सावली मुलांचे हक्काचे घर या उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली. गेल्या दोन दशकापासून शेकडो निराधार आई वडील नसलेल्या सावलीने समता – बंधुता – चारित्र्य आणि सौहाद्र ह्यांचा संस्काराबरोबरच स्वतः च्या हक्काचा घराची उब दिली आहे.

आई वडील नसलेली मुले व निराधार मुलांसाठी एक सुरक्षित आणि सुसंकृत वातावरण मिळवून देत सावली घर, अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजांचीबरोबर शिक्षण आणि आरोग्य विषयक सर्वांगीण काळजी इथं घेतली जाते.

सावलीचा पाया नैतिकता आणि समानतेच्या तत्वावर आधारलेला असून बालहक्क संरक्षण व संवर्धनासाठी सावली नेहमी प्रयत्नशील असते. इथली मुल कितीही कितीही दारिद्य आणि सामाजिक विषमतेच्या परिस्थितीतून आलेली असली तरी, इतर मुलांप्रमाणे सर्वोत्तम सुविधा मिळतात.

CamScanner

## २) माझी जीवनशाळा, शिरूर घोडनदी, पुणे ;-

संकल्प परिवाराच्या कृतीत आणि स्मृतीत असणारा वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण असा उपक्रम म्हणजे माझी जीवन शाळा . पुणे जिल्ह्यातील शिरूरच्या नजीक असणाऱ्या झोपडपट्टी वस्तीतील अप्रगत बालकांच्या शैक्षणिक विकासासाठी हा उपक्रम गेली सहा वर्ष सुरु आहे आतापर्यंत शेकडो अप्रगत शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले आहे. या.

**ध्येय आणि उदिष्टे –**

- शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात अप्रगत मुलांचा समावेश करणे.
- शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण करून मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे.
- ग्रामीण व झोपडपट्टी भागातील मुलांचा शैक्षणिक स्तर उंचावणे.
- मुलभूत गरजांसोबतच आरोग्याची काळजी घेणे.

## ३) आदिवासी विकास प्रकल्प :-

आदिवासी भागातील रतनगड अभियान अभयारण्य परिसरात संस्थेने पेयजल उपक्रम राबवला आहे. आठवड्याला विनामोबदला मोफत दवाखाना सुरु करून आरोग्याची सेवा उपलब्ध करून दिली जाते. परिसरातील दहा गावात गरीब कुटुंबाना किराणा साहित्य, कपडे, मुलांना शालेय साहित्य दिले जाते.

## ४) साऊ फातिमा बाल निकेतन प्रकल्प ;-

अहमदनगर शहराच्या मध्यवर्ती दुर्लक्षित मदारी जमातीची ४३ कुटुंबाची वस्ती मागील २० वर्षापासून वास्तव्यास आहे. मदारी हि जमात मुळात भटक्या जमातीमधील आहे. त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह हा मोल मजुरीवर अवलंबून आहे. आजही या वस्तीमधील एकूण लोकसंख्ये पैकी ९८ % समाज हा निरक्षर आहे असे सर्वेमध्ये निष्पन्न झाले आहे. शिक्षणाबरोबर आरोग्य, सामाजिक विषमता, शाश्वत उपजीविकेच्या कुठल्याही पर्याय यांचाकडे नाही. या वस्तीमध्ये ६ ते १८ वयोगटातील ५५ बालके आहेत पैकी ५० बालके शाळाबाह्य आहेत या बालकांची संकल्प प्रतिष्ठान संचलित साऊ फातिमा बाल निकेतन प्रकल्पांतर्गत शालेय वर्ग चालवण्यात येत आहे.

## ५) प्रकल्प सावली गोशाळा :-

सावली गायींचाही सांभाळ करते. त्या गायींमध्ये मुलं रमतात आईची जागा या गाई घेतात. मुलांचा मुकुंदवास या गायीबरोबर होत राहते. यातून नाते घट्ट होते.

गायींच्या शेणापासून गौरी तयार करणे व त्याचा उपयोग दररोज अग्नीहोत्र करण्यासाठी करण्यात येतो. मुले ताण – तणावात असल्यावर एकांत गाईच्या गोठ्यात जातात, गाईच्या बछडया सोबत खेळतात. हे वातावर त्यांना प्रसन्नता, उर्जा देणारे व ताण – तणावापासून मुक्त करणारे असते.

## ६) सदगुरू साहेबराव आवारे वाचनालय :-

सावलीकड अडीच हजार पुस्तकांचं भव्य वाचनालय आहे. मुलांना ज्यावेळेस वेळ मिळतो त्यावेळेस त्यांना हंव ते पुस्तक मुलं घेतात वाचतात आणि त्या वाचलेल्या पुस्तकावर चर्चा करतात.

## ७) सावली लाकडी तेलघाना :-

"सावली लाकडी घाण्याचे तेलघाना " हा लघुउद्योग सुरु करण्यापाठीमागचा हेतु असा की मुलांना स्वावलंबनाचे धडे मिळावे, पारंपारिक घाण्यातील तेल हे मुलांच्याही आहारात असावे व त्याच बरोबर

CS CamScanner

सावली परिवारासोबत जोडलेल्या स्नेहीना हि पूर्णपणे नैसर्गिक आणि शास्त्रोक्त पद्धतीने तयार केलेले १०० % खात्रीशीर तेल देऊ शकतो. सावलीतील वयवर्ष १८ पूर्ण झालेल्या मुलांसाठी रोजगार निर्मिती ची संधी यारुपाणे तयार होईल. तसेच या उद्योग पासून मिळणाऱ्या नफ्यातून सावलीच्या कार्यास मदत होईल.

**५) सावली प्रकल्प शाहापूर शाखा, ठाणे**

शहापूरमध्ये खातिवली, वासिंद पश्चिम येथील टाटा हौसिं च्या शुभगृह या टुमदार वसाहतीत सेक्टर ब मध्ये अहमदनगर मधील संकल्प प्रतिष्ठानच्या "सावली" या समाजाभिमुख संस्थेच्या शहापूर शाखेचा शुभारंभ सुप्रसिद्ध लेखक व कवी प्रवीणजी दवणे यांच्या हस्ते ओगस्ट २०२१ मध्ये संपन्न झाला.

शहापूर, मुरबाड परिसरातील दुर्गम, आदिवासी भागातील लहान मुले ,तसेच मोठी मुले, निराधार ,वंचित किंवा शाळाबाह्य अप्रगत मुले यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी तसेच बेरोजगार युवक युवतीना आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशाने शाहापूर येथे सावली शाखा चालू करून कार्यास सुरुवात केली.

## प्रस्तावित प्रकल्प

### सावली पुनर्वसन प्रकल्प ( वांजोळी , पांढरीपूल)

संकल्प प्रतिष्ठान अंतर्गत संस्थापक श्री नितेश बनसोडे यांच्या प्रेरणेमधून अहमदनगर शहरापासून ३० किमी अंतरावर पंढरीपूल जवळ वांजोळी गावामध्ये निसर्गरम्य डोंगर दऱ्यांच्या सानिध्यात तीन एकर जागेमध्ये १०० मुलांसाठी निवासी प्रकल्प चालू करावयाचा आहे. या प्रकल्पामध्ये १०० मुला – मुलींसाठी **निवासी शाळा, पारंपारिक घर ( वसतिगृह) , ध्यान केंद्र, कौशल्य विकास केंद्र, लघु उद्योग प्रशिक्षण केंद्र, शेती प्रशिक्षण केंद्र व वृद्धाश्रम** इ. प्रकल्प नियोजित आहेत.

**१) सावली पुनर्वसन प्रकल्प (मुला – मुलींसाठी निवासी वसतिगृह) :-**

या प्रकल्पात महाराष्ट्रातील निराधार, वंचित, उपेवित आई- वडील नसलेल्या, उस तोड कामगारांच्या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अन्न , वस्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या सोबत व्यवसाय प्रशिक्षण देनाचा मानस आहे. या वस्तीगृहाची रचना पारंपारिक पद्धतीने करावयाची असून येथील बालकांना कुटुंबाप्रमाणे संगोपन करावयाचे आहे.

**२) ध्यान केंद्र :-**

संस्थेमध्ये लाभ घेणाऱ्या बालकांसाठी ध्यान केंद्र उभारायचे आहे. आज पर्यंत काळजी व सरक्षणाची गरज असलेल्या भारतातील कोणत्याही संस्थेमध्ये ध्यान केंद्र नाही.

**३) कौशल्य विकास केंद्र ( अनौपचारिक शिक्षण कार्यक्रम) :-**

लोकसहभागातून संकल्प प्रतिष्ठान गेली २० वर्षे मुलांना आत्मविश्वासपूर्ण स्वावलंबी शिक्षणाची धडे देत आहे. हे काम करत असताना असा अनुभव आला कि १६ वर्षांपुढील मुलांना कौशल्य विकासाची अत्यंत गरज आहे. शिक्षण अर्थपूर्ण बनवण्यासाठी, त्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून शिकले पाहिजे , प्रत्यक्ष काम करत शिकणे हि शिकण्याची नैसार्गिग पद्धत आहे. याला अनुसरून मुलांसाठी

१) अभियांत्रिकी
२) उर्जा आणि पर्यावरण
३) शेती आणि पशुपालन
४) गृह व आरोग्य

CS CamScanner

हे कोर्सेस घेऊन प्राथमिक स्थरावर हा उपक्रम सुरु करावयाचा आहे.

४) **लघु उद्योग प्रशिक्षण केंद्र, शेती प्रशिक्षण केंद्र**

या उपक्रमांतर्गत वयाच्या १८ पर्यंत संस्थेमध्ये वास्तव्यास राहिलेल्या किंवा १६ ते २१ वयोगटातील शिक्षणापासून वंचित राहिलेल्या,अप्रगत, शिक्षणाची आवड नसणाऱ्या बालकांसाठी स्वतः चे छोटे मोठे व्यावसाय चालू करण्यासाठी **लघु उद्योग प्रशिक्षण केंद्र, शेती प्रशिक्षण केंद्र** चालू करावयाचे आहे. ( लाकडी तेलघाणा, शेवाई गिरणी, कांडक मशीन, शिलाई काम, मूर्ती काम, मसाले उद्योग, शेती, फळबाग, गोपालन, शेळी पालन ई. ) प्रकारचे व्यवसाय केंद्र चालू करावयाचे आहे.

**५) वृद्धाश्रम :-**

विभक्त कुटुंब पद्धती आणि बदलणारा काळ यामुळे वृद्धाश्रम ही काळाची गरज बनली आहे. ज्येष्ठांनीही ती स्वीकारली आहे. या पुढच्या काळात वृद्धाश्रमात राहणा-या ज्येष्ठांची संख्या वाढत असल्याचे काही सर्वे मध्ये समोर आले, त्यांअनुषंगाने सावली परिवाराकडून **वृद्धाश्रम** हा नियोजित प्रकल्प आहे.

## उद्दिष्टे:-

- औपचारिक/अनौपचारिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी
- गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना अन्न आणि निवारा प्रदान करणे
- शैक्षणिक मार्गदर्शन करणे.
- आरोग्य जागरूकता विकसित करणे

CamScanner

**Short profile of the ngo-**

| | |
|---|---|
| Name of Ngo | Sankalp Pratishthan. |
| Acronym if any | Sankalp |
| Directives | **Vision-** To develop the educated and skilled society, this will nurture the future of next generations.<br><br>**Goal**-Educated society as a tool for the development of the society and ultimately for the social justice.<br><br>**Mission**-To develops the tools of education and training to orphan. |
| Organizational<br><br>Address | Plot no 3, Near Carmell School, Link Road, Bhushan Nagar, Kedgaon, Ahmednagar, Maharashtra – 414005<br><br>info.savalee@gmail.com<br><br>www.savalee.org |
| No. of Offices | As per above address. |
| Contract No. | +91-9890969315 |
| Contact Person<br><br>Designation | Mr. Nitish Bansode,<br><br>President |
| Registration under FCRA. | FCRA – 083720163 |
| PAN Card - | AADTS7346C |
| Registration under Indian society registration Act 1860 and Maharashtra Public Trust Act-1950 | Maha /551/01/A. Nagar<br><br>Public Trust – F-6426 |
| Registration under Income tax act-80g | Income Tax Act 80G – Pn/CIT-1/80G/244/2010-11/4197 |
| Registration under Income tax act-12AA | Income Tax Act 12AA -Pn/CIT-1/12(a)/42/2007-08/3458 |
| Niti Aayog Regi no | MH/2017/170779 |
| C.S.R No | CSR00016122 |
| Bank Account Details | Account Name: Sankalp Pratishthan Bank: Axis Bank, Tilak Road, AhmednagarAccount No.: 913010004564483<br><br>IFSC: UTIB0000215 |

CamScanner

**अंदाजपत्रक**

| S. No. | Cost Items | Unit Cost | Unit | Total Budget(Yearly) | Notes |
|---|---|---|---|---|---|
| १. | **बांधकाम खर्च** | | | | |
| १.१ | १०० मुलांच्या निवासासाठी वसतिगृह @१८२७५ चौ.फु<br>(१८२७५*१६००) प्रती चौ.फु बांधकाम खर्च | २,९२,४०,०००.०० | १ | २,९२,४०,०००.०० | @ १०० मुलांकरिता शयनशाळा :- ८००० चौ.<br>@ वर्ग खोल्या ५*३०० :- १५०० चौ.फु<br>@प्रथमोपचार खोली :- प्रती बालक ७५ चौ.फु. २५ बालकांसाठी १८७५ चौ.फु<br>@ स्वयंपाक घर :- ५०० चौ. फु<br>@ भोजन कक्ष :- १२०० चौ.फु<br>@मनोरंजन कक्ष :- १००० चौ.फु<br>@ग्रंथालय, संगनक कक्ष :- १००० चौ.फु<br>@ २० स्नानगृहे २५* २० :- ५०० चौ फु.<br>@२५ प्रसाधन गृहे २५*२५ :- ६२५ चौ.फु<br>@कार्यालय खोल्या :- १५०० चौ.फु<br>@समुपदेशन व मार्गदर्शन कक्ष :- १५० चौ.फु<br>@ प्रभारी व्यक्तींना निवास :- ३५० चौ.फु |
| १.२ | कार्यशाळा @ ७५००<br>(७५००*१६००) प्रती चौ.फु बांधकाम खर्च | १,२०,००,०००.०० | १ | १,२०,००,०००.०० | @ कार्यशाळा प्रतीबालक ७५*१०० :- ७५०० चौ.फु |
| १.३ | आर.सी.सी + जाळी कुंपण | १२,००,००० .०० | १ | १२,००,००० .०० | तीन एकर जागेसाठी कुंपण खर्च |
| | **उप एकूण** | | | **४,२४,४०,०००.००** | |
| २ | इतर खर्च | | | | |
| २.१ | विहीर + मोटार | ६,००,०००.०० | १ | ६,००,०००.०० | ६० फुट खोल विहीर खोदकाम व बांधकाम |
| २.२ | पत्र्याचे शेड | ३,८०,०००.०० | १ | ३,८०,०००.०० | @१००फुट लांब * २२ फुट रुंद |
| २.३ | जागेची लेवल व व्यवस्थापन | २,००,०००.०० | १ | २,००,०००.०० | @ ३ एकर जागेची लेवल व मुरूम भरणी अंदाजे खर्च |
| २.४ | स्कूल बस २५ सीटर | २०,००,०००.०० | १ | २०,००,०००.०० | मुलांना शाळेत जाण्या येण्यासाठी स्कूल बस |
| २.५ | INTERACTIVE BOARDS | १,५०,०००.०० | २ | ३,००,०००.०० | @ डिजिटल शिक्षण |
| २.६ | सोलर युनिट | ७,००,०००.०० | १ | ७,००,०००.०० | @ १० K.W |
| १.१० | विद्युत कनेक्शन खर्च ( अंदाजे) | ३,००,०००.०० | १ | ३,००,०००.०० | @ १५ लाईट पोल व १ २५.W डी.पी |
| | **उप एकूण** | | | **४४,८०,०००.००** | |
| | **एकूण** | | | **४,६९,२०,०००** | चार कोटी एकूणसत्तर लाख वीस हजार रुपये |

CamScanner